# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## एका दिवसात 1.44 लाख प्रवाशांचा मेट्रोतून प्रवास

## • वर्षातील सर्वाधिक प्रवासी संख्या

## • महामेट्रोसाठी शनिवार ठरला माईलस्टोन



नागपूर. धम्मचक्र प्रवर्तन दिन तसेच विजयादशमीनिमित्त महामेट्रोने मेट्रोच्या फेऱ्या वाढविल्या होत्या. परिणामी शनिवारी 1.44 लाख प्रवाशांनी मेट्रोतून प्रवास केला. ही आतापर्यंतची तसेच या वर्षातील सर्वाधिक प्रवासी संख्या असून शनिवार महामेट्रोसाठी माईलस्टोन ठरला आहे. धम्मचक्र प्रवर्तनदिनानिमित्त बाहेरून आलेल्या बौद्ध अनुयायांनीही मेट्रोचा लाभ घेतला.

विजयादशमी तसेच धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त शहरात होणारी गर्दी लक्षात घेता महामेट्रोने प्रवाशांसाठी आधीच उपाययोजना केल्या होत्या. खापरी, ऑटोमोटिव्ह चौक, लोकमान्यनगर आणि प्रजापतीनगर या चारही टर्मिनल स्थानकांवरून रेल्वेच्या वेळा मध्यरात्री 12 पर्यंत वाढवण्यात

आल्या होत्या. मेट्रोने वाढविलेल्या फेऱ्या तसेच वेळेमुळे नागपूरकरांना तसेच विविध राज्य तसेच विदेशातून आलेल्या लोकांनाही शहरातील उत्सवाचा आनंद लुटता आलाच, शिवाय त्यांचा प्रवासही आरामदायी आणि त्रासमुक्त झाला. शनिवारी सर्वच मेट्रो स्थानकांवर मोठी गर्दी दिसून आली. मेट्रोमुळे हजारो बौद्ध बांधवांना दीक्षाभूमीवर पार पडलेल्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे साक्षीदार होता आले. शहराच्या इतर भागातही उपक्रम आयोजित केल्यामुळे बौद्ध बांधवांनी शहरांतर्गत प्रवासासाठी मेट्रो ट्रेनचा मोठ्या प्रमाणावर वापर केला.

मेट्रोच्या वेळेत वाढ करण्यासोबतच नागपूर मेट्रोने मेट्रो स्थानकांवर तिकीट काउंटर कर्मचारी, सुरक्षा रक्षक आणि हाऊस किपिंग स्टाफच्या रूपात पुरेसे मनुष्यबळ तैनात करून इतर उपाययोजना केल्या आहेत. त्यामुळे मेट्रोने प्रवासाचा अनेकांचा अनुभव सुखद राहीला. ही वाढलेल्या प्रवासी संख्या महा मेट्रो नागपूरच्या प्रयत्नांचे फळ आहे. विजया दशमी किंवा दसरा, 9 दिवसांच्या नवरात्र उत्सवाच्या कळसाचे प्रतीक आहे.

नवरात्रीनिमित्त गरबा असो की देवी दर्शन, नागपूरकर रात्री उशिरापर्यंत घराबाहेर पडले. त्यांच्या सुखद प्रवासासाठीही मेट्रोने उपाययोजना केल्या होत्या. शनवारी प्रवासी संख्या दीड लाखांपर्यंत पोहोचल्याने महामेट्रोने  नागपूरकरांचे आणि प्रवाशांचेही आभार मानले.





